## प्रकरण – आठ

# उपसंहार

## प्रकरण – आठ

# उपसंहार

"मराठीतील निवडक प्रादेशिक कादंबऱ्यांचा तौलनिक अभ्यास" हा या प्रबंधाचा अभ्यास विषय आहे. हा अभ्यास स्थूलमानाने १९४७ ते २००० पर्यंत प्रादेशिक कादंबऱ्यांपुरता मर्यादित आहे. या अभ्यासासाठी प्रादेशिक वैशिष्टयानुसार पुढील पाच विभागातील प्रत्येकी दोन अशा एकूण दहा (गोमंतक : १.'भावीण' : बा. भ. बोरकर (१९५०) २.'आमचे गोयं, आमका जायं'– सुभाष भेंडे (१९७१) कोकण : १.'पडघवली' : गो. नी. दांडेकर ( १९५५) २.'इंधन': हमीद दलवाई (१९६५) पश्चिम महाराष्ट्र : १. 'बनगरवाडी'– व्यंकटेश माडगुळकर (१९५५), २.'गोतावळा'– आनंद यादव (१९७१) विदर्भ : १.'धग' – उद्धव शेळके (१९६०) २.'झेलझपाट' – मधुकर वाकोडे (१९८८) मराठवाडा : १.'पाचोळा' – रा. रं. बोराडे (१९७१) , २.'विषवृक्षाच्या मुळ्या' – वासुदेव मुलाटे (१९८९) ) अशा प्रादेशिक कादंबऱ्या विचारात घेतल्या आहेत.

॥ १ ॥

__प्रकरण एक__ मध्ये अभ्यास विषय निवडण्याची कारणे, अभ्यासाची उद्दिष्टे, अभ्यासाची व्याप्ती आणि मर्यादा, अभ्यासाची पध्दती आणि मांडणी याविषयाची भूमिका स्पष्ट केली आहे.

॥ २ ॥

__प्रकरण दोन__ मध्ये प्रादेशिक कादंबरीच्या संकल्पनेत 'प्रदेश' हा शब्द एक प्रांत, भाग ह्या अर्थाने वापरला जातो. तर साहित्यातील कथा, पात्रे, भाषा या घटकांवर प्रभाव गाजविणारी प्रवृत्ती महणजेच 'प्रादेशिकता' होय.

प्रादेशिक कादंबरीचे स्वरूप व वैशिष्टये मध्ये भौगोलिकता, निसर्ग, लोकसंस्कृती, मागासलेपणा आणि समस्या, सामूहिकता, भाषा ह्या घटक तत्वांची प्रत्यक्ष अप्रत्यक्षपणे कमी – अधिक प्रमाणात योजना केलेली आढळून येते.

स्वातंत्र्यपूर्व काळातील कादंबऱ्यांच्या लेखनामागील प्रेरणा ही ग्रामजीवनातील दारिद्रय व्यवसनाधीनता, अंधश्रध्दा आणि नैसर्गिक आपत्ती यामुळे ग्रासलेल्या ग्रामीण

माणसांचे चित्रण करणे ही होती. तर स्वातंत्र्योत्तर कादंबऱ्यांच्या लेखनामागील प्रेरणामध्ये जीवनचित्रणात विविधता दिसते.

॥ ३ ॥

**प्रकरण तीन** मध्ये निवडक प्रादेशिक कादंबऱ्यांचा आशयनिष्ठ अभ्यास केला आहे.
**"भावीण"** या बा. भ. बोरकर यांच्या कादंबरीत गोमंतकातील शेवंती या भाविणीच्या जीवनाची
कहाणी आहे. भाविणीचे आदर्श असतात. हे आदर्श शेवंतीच्या आत्मबलिदानातून जाणवते व तिच्याहून समाजात थोर गणलेल्यांचे स्वार्थ व नैतिक अध:पतन आढळते. शेवंतीच्या आत्मबलिदानाचे हे चित्र अतिकरूण, स्वप्नाळू, काव्यमय म्हणून हृदयस्पर्शी उतरले आहे. एखाद्या पुरुषाने एखाद्या स्त्रीला 'ठेवली' ह्या कल्पनेने हा समाज वाईट ठरवीत नाही.

एखाद्या वस्तूची सहज देवाण - घेवाण करावी तशी येथे त्यांच्या शरीराची - शरीरसुखाची देवाण - घेवाण होते, हे जीवनाचे वेगळे तत्वज्ञान मांडले आहे.

**"आमचे गोयं, आमका जाय"** या कादंबरीत सुभाष भेंडे यांनी गोमंतकाच्या पार्श्वभूमीवरील स्वातंत्र्य लढ्याची स्फूर्तिदायक कहाणी लिहिली आहे. श्रीपाद हा स्वार्थत्यागी आणि निरागस कार्यकर्ता व त्याच्या पार्श्वभूमीवर काळाबाजार व अन्य भल्याबुऱ्या मार्गाने पैसा मिळविणाऱ्या घाणेकर हा मदोन्मत श्रीमंत व्यक्तीच्या कृटील कारवाया लेखकाने मांडले आहेत.

**"इंधन"** या कादंबरीत हमीद दलवाई यांनी हिंदू -मुस्लिम आणि नवबौध्द यांच्यातील संघर्ष चित्रित करतात. जातीय व धार्मिक स्वरूपाची वैमनस्ये आणि विजातीय - विधर्मीयांचे व्यक्ती म्हणून असणारे परस्पर संबंध हा या कादंबरीचा विषय आहे. हिंदू -मुस्लिम संघर्षातून ग्रामजीवनावर झालेला परिणाम आणि पुन्हा निर्माण झालेल्या पूर्वस्थितीचे वर्णन केले आहे.

**"बनगरवाडी"** या कादंबरीत व्यंकटेश माडगुळकरांनी माणदेशातील विटेआटपाडी या औंध संस्थानातील प्रदेशातील उपेक्षित धनगरांचे चित्रण केले आहे.

माणदेशातील अतिसामान्य सोशिक, श्रध्दाळू, शहरी संपर्कापासून दूर असलेली, निसर्गाला शरण जाणारी माणसे रेखाटली आहे.

या धनगरांच्या वस्तीत पोरवयाचा मास्तर बंद पडलेली शाळा चालवण्यासाठी येतो. ही वस्ती म्हणजेच 'बनगरवाडी' होय. एका वर्षभरातल्या धनगर वस्तीच्या जीवनचक्राचा तपशील येतो. यथार्थ जीवनवास्तवाचे चित्रण करणारी कलाकृती म्हणून 'बनगरवाडी' महत्वाची मानली जाते.

**"गोतावळा"** या कादंबरीत आनंद यादव यांनी कोल्हापूर – कागल परिसरातल्या एका खेडेगावात सालगडी म्हणून शेतकाम करणाऱ्या नारबाची आत्मकथा रेखाटली आहे. एका वर्षभरातले ऋतुचक्र आणि त्याच्याशी निगडीत असे कृषिजीवन बारकाव्याने मांडले आहे. पारंपरिक ग्रामीण जीवन उपयोगितावादी यंत्रसंस्कृतीच्या प्रभावाने हळूहळू उद्ध्वस्त होत आहे. हा या कादंबरीचा विषय आहे.

उध्द्व शेळके यांनी **"धग"** या कादंबरीत विदर्भातील ग्रामीण जीवनाचे प्रभावी चित्रण केले. परंपरागत ग्रामीण व्यावसायिकांची कुचंबणा हा प्रस्तुत कांदबरीचा विषय आहे. शिंपी समाजातील कौतिकच्या संसाराची परवड लेखकाने चित्रित केली आहे. पारंपरिक व्यवसायाबद्दलच्या प्रतिष्ठेच्या कल्पनांवर लेखकाने प्रकाशझोत टाकला आहे. गावगाड्यातील जिव्हाळा – प्रेमळपणा नष्ट होत असल्याची समस्या लेखकाने चित्रित केली आहे.

मधुकर वाकोडे यांनी **"झेलझपाट"** या कादंबरीत तारूबांधातील कोरकू आदिवासींच्या जीवनाची परवड रेखाटली आहे.
सरकारी अधिकारी कायदे आणि व्यापारी यांच्यामुळे कोरकूची पारंपरिक नैसर्गिक जीवनशैली नष्ट होत आहे. फूलय आणि केरू या दोघांच्या असफल प्रीतीची कहाणी ही झेलझपाटमधून अधोरेखित होते.

रा. रं. बोराडे यांची **"पोचोळा"** ही कादंबरी आधुनिकतेकडे आकर्षित होणाऱ्या ग्रामीण माणसाच्या मनोवृत्तीचे दर्शन घडविते. त्या निमित्ताने जुन्या ग्रामव्यवस्थेतील शिंप्यासारख्या बलुतेदार घटकाची होणारी शोकांतिका, त्यांची अकुशलता आणि त्यामुळे त्यांचे काळाच्या मागे असणे याचे दर्शन घडते. एवढेच नव्हे तर त्यामुळे त्यांच्या वाट्याला येणारे दारिद्रय आणि समस्या यांचे दर्शन घडते.

वासुदेव मुलाटे यांनी **"विषवृक्षाच्या मुळ्या"** कादंबरीत भ्रष्टाचाराने पोखरलेले सहकार क्षेत्र रेखाटले आहे. सहकाराच्या मार्गाने येणाऱ्या कर्जबाजारीपणाचे दर्शन घडविले आहे.

॥ ४ ॥

**प्रकरण चार** मध्ये प्रादेशिक कादंबऱ्यांतील व्यक्तिचित्रण रेखाटलेले आहे. **"भावीण"** कादंबरीतून भावीण स्त्रियांची मानसिकता तिचे गोमंतकीय समाजव्यवस्थेतील नगण्य स्थान आणि शांतादुर्गीवरील श्रध्दा असलेल्या समाजात श्रध्दाळू माणसे येथे जिवंत केली आहेत. या कादंबरीत शेवंती, तिची आई फुलवंती, कर्मठ खळूदादा, घराण्याची प्रतिष्ठा आणि शांतता भंग होऊ नये संयमाने सर्वामध्ये संतुलन राखणारी रमाक्का आणि अंताशेट ह्यांची शब्दचित्रे लेखकाने रेखाटली आहेत.

**"आमचे गोयं, आमका जाय"** या कादंबरीत श्रीपाद हा स्वार्थत्यागी व निरागस कार्यकर्ता ही प्रमुख व्यक्तिरेखा व त्याच्या पार्श्वभूमीवर काळाबाजार अन्य वाईट मार्गाने पैसा मिळविणारा घाणेकर आणि श्रीमंत व्यक्तीच्या कृटिल कारवाया लेखकाने रेखाटल्या आहे.

**"पडघवली"** मधून कोकणी माणसाची कष्टाळू वृत्ती कोर्टकचेरीचे करण्याची सवय आणि पाटपाण्यासाठी संघटित होण्याची वृत्ती, उत्सवप्रियता रेखाटली आहे. प्रामुख्याने अंबू वहिनी अधिक लक्षात राहते, ती निवेदिका म्हणून नव्हे तर ती सज्जन, खानदानी, सोशिक असूनही संसाराची जबाबदारी खंबीरपणे पेलणारी आहे. त्याप्रमाणे प्रसंगी धडाडीने पुढे येणारी आहे असे असले तरी 'पडघवली' हे गावच नायकस्थानी आहे.

**"इंधन"** कादंबरीतून हिंदू – मुस्लिम आणि नवबौध्द यांच्यातील संघर्ष चित्रित केला आहे. त्यामुळे निवेदक मी किंवा अन्य व्यक्तीला येथे नायकत्त्व लाभलेली नाही तर संपूर्ण समूहच कादंबरीच्या केंद्रस्थानी आहे.

**"बनगरवाडीतून"** माणदेशातील अतिसामान्य सोशिक, श्रध्दाळू, शहरी संपर्कापासून दूर असलेली, निसर्गाला शरण जाणारी माणसे रेखाटले आहेत. सततच्या

अवर्षणग्रस्त परिस्थितीने त्यांचा जीवन-व्यवहार नियत केला आहे. ते निसर्गावलंबी आणि मेढरावलंबी जीवन जगतात. सर्वजण साधे -भोळे, सरळ आहेत. येथे माणदेशच नायक आहे. परंतु येथील लोकांच्या गतिशून्य जीवनामध्ये थोडे चैतन्य येते ते मास्तराच्या आगमनामुळे विशेषत: त्याने बांधायला काढलेल्या तालमीमुळे आणि तिचे उद्घाटन करण्यासाठी आलेल्या पंत सरकारमुळे.

"**गोतावळा**" मध्ये उपयुक्ततावादी यंत्र संस्कृतीच्या आक्रमणामुळे शेतमजूरांचे भावविश्व उद्ध्वस्त झाले, हे चित्रित करताना सोशिक, कष्टाळू, श्रध्दाळू, प्राणिमात्रांवर प्रेम करणारा नारबा शेतमजुरांचा प्रतिनिधी म्हणून जिवंत केला आहे. रामू सोनवडे हा स्वार्थी सरंजामदार आणि ड्रायव्हर पाव्हणा हे कुशल नोकरवर्गाचे प्रतिनिधी आहेत. व्यक्तिरेखाटनाचा विचार करता समूहजीवनचित्रणाची किंवा प्रदेश गाव जिवंत करण्याची प्रेरणा आहे.

"**धग**" कादंबरीत कष्टाळू, जिद्दी, कौतिक रेखाटली आहे, ती पतिपरमेश्वर मानणारी, प्रसंगी धडाडीने पुढे येणारी आहे. तिचा नवरा महादेव अहंकारी, हेकट आणि आळशी वऱ्हाडी माणसांचा प्रतिनिधी आहे. वाटसरूचा पाहूणचार करणारी माणसे जशी दिसतात, त्याचप्रमाणे सकीना-बानो यांच्या रूपाने समान आर्थिक स्तरावरील एकमेकांवर प्रेम करणारी माणसेही रेखाटली आहेत. धनिकांचा मुजोरपणा, सरंजामी वृत्ती येथे दिसते.

"**झेलझपाट**" मध्ये कोरकू आदिवासींची शासनाच्या कायद्यांमुळे, व्यापाऱ्यांकडून होणाऱ्या शोषणामुळे त्यांच्या पारंपरिक जीवनशैलीचा ऱ्हास लेखकाने रेखाटला आहे. त्यामुळे केरू किंवा फूलय केंद्रस्थानी नाही तर कोरकू समाजच केंद्रस्थानी आहे. विलक्षण साठी नागदेवतांची पूजा करणारी, शिडू पिऊन ढोलाच्या तालावर नाचणारी, परंपरा जपणारी माणसे जिवंत केली आहे.

"**पाचोळा**" मध्ये शिंपी समाजातील पार्वतीची शोकांतिका स्वातंत्र्योत्तर काळातील बलुतेदार शिंपी समाजाचीच शोकांतिका आहे. गंगाराम हा हेकेखोर जिद्दी आहे, त्याला पारंपरिक शिंपी धंद्याची सवय लागलेली असल्यामुळे तो अन्य व्यवसाय करू शकत नाही म्हणूनच तो शिंपी व्यवसायातील नवे तंत्र (फॅशन) शिकण्यासाठी धडपडतो मुलाने अद्ययावत पध्दतीने कपडे शिकवण्याचे काम शिकावे म्हणून प्रयत्न करतो.

**"विषवृक्षाच्या मुळ्या"** या कादंबरीमधून मराठवाड्यातील लोकजीवन चित्रण आले आहे. दारिद्रय, मागासलेपण अज्ञान आणि मानपानप्रतिष्ठेच्या कल्पना यामुळे येथे निर्माण झालेल्या समस्या पात्रांच्या कृतिउक्तींतून दिसतात. केंद्रस्थानी असला तरी सहकारातील भ्रष्टाचारामुळे शोषण होणारा सामान्य माणूसच येथे केंद्रस्थानी आहे. दुष्काळामुळे कर्ज भरू न शकणाऱ्या सावकार आणि वसुली अधिकाऱ्यांनी शोषण केलेल्या समाजाचे चित्र लेखकाने रेखाटले आहे.

॥ ५ ॥

**प्रकरण पाच** मध्ये प्रादेशिक कादंबऱ्यांची भाषाशैलीचे वर्णन केले आहे. **'भावीण'** या गोमंतकीय जीवनदर्शन घडविणाऱ्या कादंबरीचे निवेदन प्रमाण मराठी भाषेत असून संवाद कोकणी बोली भाषेतील आहे. भाषेची कलात्मकता संवादामधून भावदर्शन करणारी आहे. 'वाफोर' 'काचोळी' हे अपरिचित व गोमंतकाशी निगडीत असलेले नावीन्यपूर्ण शब्दांची योजना केली आहे.

**"आमचे गोयं, आमका जाय"** या गोमंतकीय जीवनदर्शन घडविणाऱ्या या कादंबरीचे निवेदन प्रमाण मराठी भाषेत असून संवाद कोकणी बोली भाषेत आहे.

**"पडघवली"** कादंबरीत कोकणी बोलीचा वापर केला आहे. भाषेतील कलात्मकता कधी निवेदनाच्या ओघात तर कधी संवादामधून आढळते . कोकणी बोलीतील लकबी आणि संवादातून प्रदेश दृग्गोचर होतो. कथानैपुण्य मोत्यासारखी शब्दकळा, रसरशित सौदर्य दृष्टी मानवी मनोवृत्ती विषयी समज हे गुण प्रकर्षाने व्यक्त होतात.

**"इंधन"** कादंबरीचे निवेदन प्रमाणभाषेत असले तरी संवादासाठी कोकणी बोलीचा वापर केला आहे. भाषेतील कलात्मकता कधी निवेदनाच्या ओघात तर कधी संवादामधून आढळते. कोकणी बोलीच्या ढंगाने हिंदीतील शब्दाचा केलेला वापर आणि

बोलीतील शब्द, म्हणी, वाकप्रचारादितून प्रदेश साकार होतो.

**"बनगरवाडी"** चे निवेदन आणि संवाद माणदेशातील बोलीतच आहे. साधी – सरळ, सोपी अशी ती बोली मेंढपाळांच्या दैनंदिन वापरातील आहे. आशयाची एकजीव अशी भाषा वापरली आहे. चित्रात्मकता हा लेखकाच्या भाषेचा विशेष पैलू आहे.

**"गोतावळा"** या कादंबरीचे निवेदन व संवादासाठी कोल्हापुरी बोलीच वापरली आहे. नारबाच्या भावविश्वातूनच त्याची भाषा आकारास येते. शेती सभोवतालचा निसर्ग यातूनच त्याचा प्रतिमासृष्टीची निर्मिती आलेली आहे. बोलीतील शब्द वैभवामुळे प्रदेश टिपता येतो. बोलीभाषेमध्ये लय आहे. विविध भावसूत्रे टिपण्याची ताकदही आहे. बोलीतील संवादामुळे ही कादंबरी अधिक जिवंत आणि वास्तवदर्शी झाली.

**"धग"** मधून निवेदनासाठी प्रमाणभाषा आली असली तरी संवाद मात्र वऱ्हाडी बोलीत आहे. म्हणी, वाक्प्रचार प्रतिमादितून प्रदेश साकार होतो. निवेदन सरळ साधे आहे. वैदर्भीय बोलीचा नाजूकपणा आणि सामर्थ्याचा प्रत्यय येतो.

**"झेलझपाट"** प्रमाणभाषेत असली तरी संवादासाठी कोरकू आदिवासींची बोली किंवा हिंदी वळणाची वऱ्हाडी बोली वापरली आहे. या कादंबरीत व्यक्तिनिष्ठ भाषा बदलते. परंतु व्यक्ती – व्यक्तीपुरते त्याच समाजातील दोन घटक एकत्र येवून बालीचा वापर करतात तसेच अन्य लोकांशी बोलताना कोरकूनी रांगडी हिंदी भाषा वापरली आहे. कोरकू लोकगीत आणि प्रतिमा – प्रतीकादींतून प्रदेश दृग्गोचर होतो.

**"पाचोळा"** या कादंबरीचे निवेदन व संवादासाठी प्रदेश विशिष्ट मराठवाडी बोली भाषेतील आहे. निवेदन प्रथमपुरुषी आहे. पार्वतीची भाषा चित्रदर्शी आहे. ही भाषा तिघा नित्यानूभवाचीच भाषा आहे. प्रतिमासृष्टी ही तिच्या अनुभव विश्वाशी इमान राखणारी आहे. बोलीतील निवदेन – संवादांनी घटनाप्रसंगाना दृश्यरूप लाभते. लकबी, म्हणी,

वाक्प्रचार, उपमा, प्रतिमादितून प्रदेश साकार होतो.

**"विषवृक्षाच्या मुळ्या"** या कादंबरीचे निवेदन प्रमाण भाषेत तर संवाद बोलीत आहे. भाषेची कलात्मकता कधी निवेदनाच्या ओघात तर कधी संवादामधून आढळते.

**॥ ६ ॥**

**प्रकरण सहा** मध्ये प्रादेशिक विभागानुसार प्रत्येक कादंबरीतील प्रादेशिकता शोधली आहे.

**"भावीण"** मधून गोव्यातील लोकजीवन चित्रण केले आहे. गोमंतकीय भौगोलिक आणि सामाजिक पार्श्वभूमी आली. सावर्डे, दुर्भाट, पर्तगाळ,मडकई ही गावे. शांतादूर्गा व शाळीग्राम ही कुलदैवते, अघनाशिनी नदी, तांबडीमाती, मंगलुरी कौलांची चुनेरी घरे, आंबे, पोकळी, माड, नारळीची हिरवी गर्द झाडी असा दृकप्रत्ययी पात्ररूपाने आलेला निसर्ग यातून प्रदेश साकार होतो.

**"आमचे गोयं आमका जाय"** या कांदबरीला गोमंतकीय भौगोलिक सामाजिक, राजकीय पार्श्वभूमी लाभली आहे. तांबडी माती, मंगलुरी कौलांची चुनेरी घरे नारळ, पोकळी, काजू, अननस असा दृश्य प्रतिमा पात्ररूपाने आलेला निसर्ग यातून प्रदेश साकार होतो.

**"पडघवली"** या कादंबरीत उत्तर रत्नागिरी जिल्ह्यातील दाभोळ पट्टा रेखाटला आहे. कोकणातील निसर्गाचे आणि वैशिष्टयपूर्ण प्रदेशाचे वर्णन केले आहे. त्यातून कोकणात येणारी पिके आणि छोटे मोठे बंधारे यांची वर्णन येतात व कोकणचा वैशिष्टयपूर्ण प्रदेश उभा राहतो. कुंभा, किंजळ, साग, हिरडा, पोकळी हे वृक्ष तगरीचे फुले, आमसुल, साठं, कडवेवाल, गरे अंब्याची आंबोशी दृक प्रत्ययी पात्ररूपाने आलेला निसर्ग यातून प्रदेश साकार होतो.

**"इंधन"** मध्ये कोकणातील चिपळूण जवळील वणेगांव, वाशिष्टी नदी, तिच्यातील विशिष्ट प्रकारचा म्हावरा मासा, मासेमारी, भातशेती, समुद्राची भरती, गवताने शाकारलेली घरे मुस्लिम खोताची मंगलेरी कौलांची घरे, दिनचक्रामुळे रंग बदलाणारा

व कोकणी लोकजीवनावर परिणाम करणाऱ्या निसर्ग वर्णनातून प्रदेश साकार होतो.

**"बनगरवाडी"** या कादंबरीत माणनदी काठच्या माणदेशातील विटे आटपाडी या औंध संस्थानातील पतसरकारच्या राजवटीतील अवर्षणग्रस्त प्रदेशातील व बगरवाडी तील उपेक्षित धनगरांचे स्वातंत्र्यपूर्व काळातील खडतर लोकजीवनाचे चित्रण लेखकाने केले आहे. उजाड माळरान, वृक्ष, पशू-पक्षी, तांबडी माती हुलगे, तूर मटकी, ज्वारी, करडई, हरबरा इ. पिके, धनगरांच्या लोकजीवनावर परिणाम करणारे उन्हाळा, पावसाळा, हिवाळा हे ऋतूचक्र आणि निसर्गवर्णनातून प्रदेश सिध्द होतो.

**"गोतावळा"** ही कादंबरी कोल्हापूर -कागल येथील जीवनचित्रण, भू-प्रदेश, निसर्गाच्या वर्णनातून तसेच बोलीभाषा आणि संस्कृती विशेषातून प्रदेश टिपता येतो. पशु-पक्षी, प्राणी तसेच माळरान, डोंगर, तळे, नदी, वांझ ढग दुष्काळ आणि ऋतूचक्राप्रमाणे रंग बदलणारा प्रतीकात्मक निसर्ग व्यक्तीच्या मानसिकतेनुरूप पात्रातून आला आहे. यातून प्रदेश निवडता येतो.

**"धग"** मध्ये विदर्भातील वर्धा, अमरावती जिल्हातील हिंगणघाट तळेगांव ठाकूर, मोझरी आणि सालबार्डी या खेड्याचे पार्श्वभूमी येथे आली आहे. वैदर्भीय माणसांचा दिलदारपणा आणि मागासलेपणा आर्थिक स्तर लेखकाने चित्रित केला आहे. कुडा - मातीचे घरे, जवस, तूर, तीळ, मूग, कापूस जोंधळा ही पीके, दाहक उन्हाळा, सपाट माळरानाचा प्रदेश टिपता येतो.

**"झेलझपाट"** मधून तारूबांधातील कोरकू आदिवासींच्या जीवनाची परवड रेखाटली आहे. अमरावती - परतवाडा मेळघाट परिसरातील कोरकू आदिवासी या जनजातीशी निगडीत प्रदेश विशिष्ट कादंबरी आहे. डोंगररांगा, सीपना नदी, लाल माती, कोदो - सवा, कुटकी ही गवती धान्ये, साळी ज्वारी ही अन्य पिके, अस्वल, डुक्कर, वाघ हे वन्य प्राणी, मोह, पळस, संकेसर, साग, मकई, चारोकी हे वृक्ष, सागाची पान-गवताने शाकारलेल्या कडी - कोंड्या कुलपाचा संबंध नसलेल्या झोपड्या यातून प्रदेश टिपता येतो.

**"पाचोळा"** मध्ये मराठवाड्यातील पठारी प्रदेशाचे चित्रण आलेले आहे. लातूर, बार्शी या खेड्यातील शिंपी कुटूंबाची ही शोकांतिका आहे.

**"विषवृक्षाच्या मुळ्या"** या कादंबरीला बीड – परभणी जिल्हांची पार्श्वभूमी लाभली आहे. सपाट माळरान किंवा काही ठिकाणाची काळी जमीन, दाहक जीव घेणारा उन्हाळा ज्वारी, मिरची, कांदे लसूण ही पिके , पत्र्या – धाब्याची, मातीच्या कच्या विटांची किंवा गोट्यांच्या भिंती असलेली घरे यातून मागासलेपण स्पष्ट होते. कर्जबाजारी अगतिक, लाचार, दरिद्री लोकांचे सावकरांकडून होणारे शोषण तसेच सरकारी वसूली अधिकाऱ्यांकडून गरिबांची होणारी पिळवणूक यातून हा प्रदेश सिध्द होतो.

II ७ II

प्रकरण सात मध्ये प्रादेशिक कादंबरी ही प्रथम कादंबरीच असते. त्यामुळे कादंबरी रचनेच्या कथानक व्यक्तिचित्रण, भाषाशैली या प्रमुख घटकांच्या आधारे तौलनिक विचार करता येतो. प्रामुख्याने भौगोलिक रचना, समाजरचना व लोकसंस्कृती या घटकांच्या आधारे प्रत्येक प्रदेशाचे वेगळेपण शोधता येते.

निवेदन – संवाद यांच्या माध्यमातून कादंबरीत व्यक्तिदर्शन घडविले जाते. कोकण (गोमंतकसह), पश्चिम महाराष्ट्र, विदर्भ, मराठवाड्यातील माणसांची काही स्वभाववैशिष्टये आणि एकूणच प्रदेश वैशिष्टये व्यक्तिचित्रणातून दिसते. प्रत्येक प्रदेशाचा आणि निसर्गाचा या लोकजीवनावर परिणाम झालेला स्पष्ट जाणवतो.

प्रत्येक प्रदेशाचे वेगळेपण बोली आणि भाषा विशेषांधारे टिपता येते. वास्तवता आणि वातावरणनिर्मितीसाठी प्रादेशिक कादंबऱ्यांमधून निवेदन आणि संवादासाठी बोलीभाषा वापरली जाते. प्रदेश विशिष्ट बोलीतील लकबी, म्हणी, वाक्प्रचार, नावीण्यपूर्ण शब्द, लोकगीत आणि लोककथा, भाषेचा कलात्मक वापर व शब्द कळेतून प्रादेशिकता स्पष्ट होते.

प्रत्येक लेखकांचा कादंबरी लेखनामागील दृष्टीकोन हा वेगवेगळा दिसतो. काळाला समांतर असे मराठी प्रादेशिक कादंबरीचे विषय व आशय बदलत गेले.

"**भावीण**" कादंबरीमध्ये स्त्री जीवनातील भावीणीच्या जीवनातील सामाजिक समस्या, स्त्री पुरूष समानतेची जाणीव अपेक्षित स्त्रीच्या भावनांचे चित्रण करणे आणि ग्रामीण समाजाच्या तळातील कष्टकऱ्यांच्या जीवनाच्या व्यथावेदना व्यक्त करणे आणि उध्दार करणे या हेतूने लेखन केलेले दिसून येते. या कादंबरीत ध्येयवाद, बोधवाद, जीवनाचे उदात्तीकरण आलेले दिसते.

"**आमचे गोयं, आमका जाय**" कादंबरीमध्ये गोमंतकाच्या पार्श्वभूमीवरील स्वातंत्र्य लढ्याची स्फूर्तिदायक कहाणी लिहिली आहे.

"**पडघवली**" मध्ये पारंपरिक गावगाड्याची पडझड ही आधुनिकीकरण, यंत्रयुग, शिक्षणप्रसार यामुळे झाली. खेडी ओस पडली.

पारंपरिक संस्कृतीची पडझड झाली म्हणून जुने जीवनमूल्य नष्ट होत आहे तरीही जुन्यातील चांगल्यांचा स्वीकार करावा या दृष्टिकोनातून लेखन केले. फडके रचनातंत्राचा प्रभाव या कादंबरीवर दिसतो.

"**इंधन**" मधून हिंदू - मुस्लिम सत्यशोधक समाज आणि दलित चळवळ आणि भारताची फाळणी यातून प्रेरणा घेऊन जातीयता हा विषय हाताळला आहे. कुळकायदामुळे निर्माण झालेल्या समस्या अनुकूल आणि प्रतिकूल परिणाम रेखाटण्याची भावना आहे. जातीयतेचे प्रखर दर्शन घडवून सामाजिक समतेबद्दल प्रेम व्यक्त करणे हे मूल्य आले आहे.

"**बनगरवाडी**" मधून ग्रामसुधारणा आणि खेड्यातील धनगरांचे उपेक्षित जीवन यावर प्रकाश टाकला आहे.

"**गोतावळा**" मधून ग्रामीण जीवनामध्ये आधुनिकतेच्या मार्गाने उपयुक्ततावादी मनोवृत्तीचे होणारे आक्रमण आणि यातून कष्टकरी ग्रामीण माणसाच्या जीवनातील ताणतणाव चित्रित झाले आहेत. आधुनिक काळात शहरांबरोबरच ग्रामीण भागामध्ये आणि कृषिउद्योगांमध्ये यंत्राचे अवतरणे अपरिहार्य आहे. परंतु ग्रामीण माणसांचे एका वेगळ्या मार्गाने होणारे शोषण आणि या शोषणातून निर्माण होणारा शोषित समाज याकडे

लेखकाने लक्ष वेधले आहे. ग्रामजीवनामध्ये येऊ लागलेल्या परिवर्तनाचे त्यातून निर्माण झालेल्या समस्यांचे चित्रण करण्याची वास्तववादी प्रेरणा आहे.

**"धग"** मधून पारंपरिक बलुतेदारी किंवा शिप्यांच्या धंद्यावर आलेल्या आपत्तीचे आणि नियतीच्या फेऱ्यात अडकलेल्या मानवी जीवनाचे चित्रण केले आहे. आधुनिकीकरणाच्या आक्रमणामुळे झालेले परिवर्तन आणि समस्या तसेच वर्तमान ग्रामीण जीवनातील बदलती वास्तवता रेखाटली आहे.

**"झेलझपाट"** कादंबरी मध्ये कोरकू आदिवासी जीवनावर प्रकाश टाकला आहे. जीवनाविष्कार अधिकाधिक वास्तवाच्या पातळीवर करण्याचा प्रयत्न केला. त्यामुळे जीवनातील वास्तवदर्शी प्रादेशिकता प्रकट होते.

**"पाचोळा"**मधून आधुनिकतेकडे आकर्षित होणाऱ्या ग्रामीण माणसाच्या मनोवृत्तीचे दर्शन घडते. त्या निमित्ताने जुन्या ग्रामव्यवस्थेतील शिंप्यासारख्या बलुतेदार घटकांची होणारी शोकांतिका, त्यांची अकुशलता आणि त्यामुळे त्यांचे काळाच्या मागे असणे दिसते. त्यामुळे त्यांच्या वाट्याला येणारे दारिद्रय आणि समस्या याचे चित्रण येते.

**"विषवृक्षाच्या मुळ्या"** या कादंबरीत ग्रामीण जीवनामध्ये नव्याने निर्माण झालेले प्रश्न, बदलते राजकारण, समाजकारण अर्थकारण आणि यात होरपळून निघणारा ग्रामीण समाज यांचे वास्तवदर्शी चित्रण केले.

या माझ्या प्रत्ययासह हा अभ्यास मी विचारवंतांच्या विमर्शासाठी नम्रपणे पुढे ठेवीत आहे.